सरकारी

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषणफॉर्म - १)

FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)

प्रथम खबर अहवाल

(बी एन एस एस संहिताच्या कलम 173 अन्वये)

1. District (जिल्हा): अहिल्यानगर | P.S. (पोलीस ठाणे): शेवगांव | Year (वर्ष): 2026

FIR No. (प्रथम खबर क्र.): 0832 | Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ): 29/10/2026 17:51 वाजता

2.

S.No. (अ.क्र.)	Acts (अधिनियम)	Sections (कलम)
1	भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८	7

3. (a) Occurrence of offence(गुन्ह्याची घटना):

1 Day (दिवस): गुरूवार | Date from (दिनांक पासून): 08/10/2026 | Date To (दिनांक पर्यंत): 08/10/2026

Time Period (कालावधी): प्रहर ५ | Time From (वेळेपासून): 12:26 तास | Time To (वेळेपर्यंत): 12:47 तास

(b) Information received at P.S. (पोलीस ठाण्यावर माहिती मिळाल्याचा): | Date (दिनांक): 29/10/2026 | Time (वेळ): 17:40 तास

(c) General Diary Reference (ठाणे दैनंदिनी संदर्भ): | Entry No. (नोंद क्र.): 019 | Date and Time (दिनांक आणि वेळ): 29/10/2026 17:40 तास

4. Type of Information (माहितीचा प्रकार): लेखी

5. Place of Occurrence (घटनास्थळ):

1. (a) Direction and distance from P.S. (पोलिस ठाण्या पासून दिशा आणि अंतर): पश्चिम, 16 कि.मी. | Beat No. (बीट क्र.):

(b) Address (पत्ता): नांदुरविहीरे, ताशेवगाव, ,ताशेवगाव, जिअहिल्यानगर

(c) In case, outside the limit of this Police Station, then Name of P.S. (पोलीस ठाण्याच्या हद्दी बाहेर असल्यास, पोलीस ठाण्याचे नाव):

6. **Complainant / Informant (तक्रारदार / माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** छाया कडु देवरे

(b) **Father's/Husband's Name (वडिलांचे/पतीचे नाव):**

(c) **Date/Year of Birth (जन्मतारीख / वर्ष):** 1989 (d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No. (पारपत्र क्र.):**

Date of Issue (दिल्याची तारीख): **Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID Details (Ration Card, Voter ID Card, Passport, UID No., Driving License, PAN) (ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पैन कार्ड))**

S. No. (अ.क्र.)	ID Type (ओळखपत्राचा प्रकार)	ID Number (ओळखपत्र क्रमांक)

(h) **Occupation (व्यवसाय):**

(i) **Address (पत्ता):**

S.No. (अ.क्र.)	Address Type (पत्ता प्रकार)	Address (पत्ता)::
1	वर्तमान पता	लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अहिल्यानगर,, शेवगांव, अहिल्यानगर, महाराष्ट्र, भारत
2	स्थायी पता	लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अहिल्यानगर,, शेवगांव, अहिल्यानगर, महाराष्ट्र, भारत

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल क्र.):** 91-8788215086

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषणफॉर्म - १)

7. Details of known / suspected / unknown accused with full particulars (ज्ञात / संशयित / अज्ञात आरोपींचे संपूर्ण तपशील):

Accused More Than (अज्ञात आरोपी एका पेक्षा जास्त असतील तर संख्या): 0

S. No. (अ.क्र.)	Name (नाव)	Alias (उर्फनाव)	Relative's Name (नातेवाईकाचे नाव)	Present Address(वर्तमान (पत्ता))
1	बापुसाहेब ठकाजी वीरकर			1. Town/Village (शहर / गाव): यातील तक्रारदार श्री अमोल दगडु,Tehsil (तहसील): Police Station (पोलीस ठाणे): शेवगांव,District (जिल्हा): अहिल्यानगर,State (राज्य): महाराष्ट्र,भारत

8. Reasons for delay in reporting by the complainant / informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

S. No. (अ.क्र.)	Propertty Category (मालमत्ता वर्ग)	Property Type (मालमत्ता प्रकार)	Description (विवरण)	Value(In Rs/-) मुल्य (रु. मध्ये)

10. Total value of property (In Rs/-) मालमत्तेचे एकूण मुल्य (रु. मध्ये) :

11. Inquest Report / U.D. case No., if any (मरणान्वेषण अहवाल/अकस्मात मृत्यू प्रकरण क्र. जर असल्यास):

S. No. (अ.क्र.)	UIDB Number (यु.आय.डी.बी.)

12. First Information contents (प्रथम खबर हकिगत):

फिर्याद

दि.29/10/2026

मी छाया कडु देवरे, वय 37 वर्ष, व्यवसाय-नोकरी, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अहिल्यानगर, मो.नं.8788215086.

मजकुर सरकारतर्फे फिर्यादी होवुन फिर्याद देतो की मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग

I.I.F.-I (एकीकृत अन्न वेषणफॉर्म - १)

अहिल्यानगर येथे पोलीस निरीक्षक या पदावर 2024 रोजी पासुन कार्यरत आहे. दिनांक 08/10/2026 रोजी तक्रारदार अमोल दगडु बुधवंत, वय-38 वर्ष, धंदा-षिक्षक, रा.मु.पोस्ट. निंबेनांदुर, ता.षेवगांव, जि. अहिल्यानगर यांनी आमच्याशी मोबाईलवर संपर्क करून एका लोकसेवका विरूध्द तक्रार असलेबाबत कळविले. त्यानंतर आम्ही मा.कार्यकारी अभियांता, मृद व जलसंधारण विभाग, अहिल्यानगर यांना प्रत्रव्यवहार करून पंच उपलब्ध करून घेतले. त्यानंतर आम्ही, दोन्ही पंच व सापळा पथकातील कर्मचारी असे निंबेेनादुर येथील सुरक्षित ठिकाणी गेलो. त्याठिकाणी आमच्या सुचनेप्रमाणे दोन्ही पंचानी तक्रारदार श्री. अमोल दगडु बुधवंत यांना त्यांचे नाव,पत्ता व तक्रार विचारता त्यांनी त्याचे नाव, पत्ता वरीलप्रमाणे सांगुन त्यांची तक्रार सांगितली की,""माझी नांदुर विहिरे गावामध्ये गट नं 222/1 मध्ये षेतजमीन असुन त्यामध्ये विहिर आहे. सदर विहिरीचे पाणी आम्ही कृशीपंपाने(लाईटवरील मोटरीने) उपसाकरून षेतीला देतो. सदर कृशीपंपाच्या लाईट पुरवठयासाठी आम्ही महावितरणचे अधिकृत कनेक्षन घेतलेले आहे.

दिनांक 06/10/2026 रोजी आमच्या गावचे वायरमन श्री. वीरकर यांना मी फोन करून आमच्या षेतीपंपाची लाईट नसल्याबाबत कळविले. त्यावेळी त्यानी मला सांगितले की, नांदुर विहीरे गावच्या परिसरातील लाईटचा पोल पडल्यामुळे तुमच्या षेतीपंपाची लाईट बंद आहे. त्यासाठी नविन पोल उभा करणे आहे. तुम्ही आणि तुमच्या परिसरातील षेतकरी 6000/-रूपये पैषांची वर्गणी गोळा करून माझ्याकडे दया,ती मी ठेकेदाराला देवुन लाईटचा पोल उभा करातो, असे सांगितले. त्यानंतर मी चैकषी केली असता सदरचा पोल हा नैसर्गिक रित्या खराब होवुन पडल्याचे माहिती समजली. तसेच त्या ठिकाणी नविन लाईटचा पोल करण्याचे काम महाविरणचे असुन त्यासाठी वर्गणी गोळा करून ठेकेदाराला पैसे देण्याची गरज नाही, याबाबत मला माहिती समजली. त्यावेळी माझ्या लक्षात आले की, श्री.वीरकर वायरमन हे मला नविन पोल टाकण्यासाठी ठेकेदाराला पैसे दयायचे असे म्हणुन लाचेची मागणी करत आहे.मला श्री.वीरकर, वायरमन यांनालाच देण्याची इच्छा नाही.

आज रोजी मी माझ्या कामासंदर्भाने श्री.वीरकर वायरमन यांची भेट घेणार आहे सदर भेटीदरम्यान त्यांनी माझ्याकडे लाचेची मागणी केल्यास त्यांच्यावर कायदेषीर कारवाई करावी. श्री.वीरकर वायरमन व माझ्यात कोणताही भांडणतंटा अगर उसनवारीचा व्यवहार नाही. त्यांनी मागीतलेली लाचेची रक्कम मी माझ्या बचतीच्या पैषातुन हजर करेल."अशी तक्रार सांगितली. त्यानंतर तक्रारदार यांनी वरीलप्रमाणे तक्रार त्यांच्या स्वःहस्ताक्षरात लिहुन दिली. त्यावर आम्ही, दोन्ही पंचांनी व तक्रारदार यांनी स्वाक्षरी केेली. त्यानंतर लोकसेवक वीरकर, वायरमन, ढोरजळगं ाव कार्यालय,ता.षेवगांव, जि. अहिल्यानगर (महावितरण)हे तक्रारदार श्री.बुधवंत यांनी दिलेल्या लाच मागणीच्या तक्रारीप्रमाणे तक्रारदार श्री.बुधवंत यांचेकडे नांदुरहिवरे गावच्या परिसरातील लाईटचा पोल पेडलेला असुन नविन पोल बसविण्यासाठी लाचेची मागणी करतात अगर कसे ? लाचेची रक्कम कधी दयावयाची ? व कुठे दयावयाची याबाबत लाच मागणी पडताळणी करण्याचे ठरले.

आम्ही तक्रारदार श्री. अमोल बुधवंत व पंच नं. 1 श्री.जाधव यांना लाच मागणी पडताळणी कारवाई दरम्यान करावयाचे कार्यवाहीबाबत आवष्यक त्या सुचना समजावून सांगितल्या. आम्ही पंचांना व तक्रारदार श्री. अमोल बुधवंत यांना लाच मागणी कारवाई बाबतची सविस्तर माहिती दिली. त्यांनतर आम्ही व्हाईस रेकार्डर चालु करुन आमचे, दोन्ही पंचाचे, तक्रारदार यांचे उपस्थितीबाबत

यांचे ताब्यात देवुन तक्रारदार व पंच नं.1 जाधव यांना वायरमन वीरकर यांची नांदुर विहीरे गावातील फिलटर पाॅईंटजळील पुल येथे भेट घेण्यासाठी 12/26 वा. सुमारास तक्रारदार व पंच नं.1 जाधव यांना तक्रारदार यांचेकडील चारचाकी वाहनाने रवाना केले. त्यानंतर आम्ही, पचं नं 2 व सापळा पथकातील कर्मचारी असे सुरक्षित ठिकाणी थांबुन राहिलो.

त्यानंतर 12/47 वा.चे सुमारास तक्रारदार व पंच नं. 1 असे सुरक्षित ठिकाणी परत आले. त्यानंतर आम्ही पंच नं. 1 श्री. जाधव यांना व त्यानंतर तक्रारदार यांना घडलेल्या घटनेविषयी विचारले त्यावेळी पंच नं 1 यांनी सांगितले की, तक्रारदार व लोकसेवक वीरकर यांच्यात पडलेल्या लाईटच्या पोला संदर्भात चर्चा झाली चर्चेदरम्यान तक्रारदार लोकसेवक वीरकर यांना म्हणाले की, पोल बसवण्यासाठी वर्गणी किती करायची अशी ? त्यावर लोकसेवक वीरकर म्हणाले की, ते सहा हजार म्हणले ना ते त्यावर तक्रारदार म्हणाले टोटल सहा हजार ? त्यावर लोकसेवक वीरकर म्हणाले की, हा मग तुम्हाला किती किती येती .....किती जणयेत तुम्ही मला ते सहा हजार म्हणालेत भो. त्यावर तक्रारदार म्हणाले की, मलाच माहीत नाही किती जणयेत आम्ही इथ मला काय माहीत किती आता तुम्ही म्हणले सहा सहा जण म्हणल्यावर हजार रूपये येतील...त्यावर लोकसेवक वीरकर म्हणाले की, करून टाका वरपर्यंत माहिती झालयं. त्यानंतर आम्ही तक्रारदार यांना घडलेली हकिकत विचारली असता त्यांनी पंच नं 01 श्री.जाधव यांच्याप्रमाणे माहिती सांगितली.

त्यानंतर आंम्ही पंचांसमक्ष पडताळणी दरम्यान व्हाॅईस रेकाॅर्डरमधील संभाशण ऐकले असता त्यामध्ये लोकसेवक वीरकर वायरमन यांनी तक्रारदार श्री. बुधवंत यांच्याकडे नांदुरविहीरे गावच्या परिसरातील लाईटचा पोल नैसर्गिकरित्या पडलेला असुन त्या ठिकाणी नविन पोल बसविण्यासाठी सहा जणांचे एकुण 6000 रूपये त्यात प्रत्येकी 1,000/- रूपये याप्रमाणे तक्रारदार यांचेकडे 1000 रूपये लाचेची मागणी करुन सदरची लाच रक्कम स्विकारण्याचे मान्य केल्याचे निश्पन्न झाले. त्यानंतर आम्ही तक्रारदार श्री.अमोल बुधवंत यांना लोकसेवक वीरकर, वायरमन यांना दयावयाची लाचेची रक्कम हजर करण्यास सांगितले असता, त्यांनी त्यांचे बचतीमधील 1,000/- रुपये, त्यात 500/- रुपये दराच्या 02 चलनी नोटा हजर केल्या. आमचे सुचनेवरून तक्रारदार श्री.अमोल बुधवंत यांनी हजर केलेली लाचेची रक्कम रूपये 1,000/- रुपये यास अँथ्राँसिस पावडर लावण्यात येवुन आवष्यक त्या सर्व तपासण्या व कार्यवाही करण्यात आली.

त्यानंतर तक्रारदार श्री बुधवंत यांनी कळविले की, लोकसेवक वीरकर यांना फोन करून ते सध्या कोठे आहेत याची खात्री करावी लागेल. त्याप्रमाणे लोकसेवक वीरकर यांना काॅल करण्याचे सर्वानुमते ठरले. त्यानंतर आमचे सुचनेवरून तक्रारदार श्री बुधवंत यांनी लोकसेवक वीरकर यांना काॅल केला असता लोकसेवक वीरकर यांनी तक्रारदार यांचा काॅल उचलला नाही. त्यानंतर थोडया वेळाने तक्रारदार यांनी पुन्हा लोकसेवक वीरकर यांना फोन केला असता त्यावेळी लोकसेवक वीरकर यांनी फोन उचलला त्यावेळी तक्रारदार यांनी भेटणेबाबत विचारले असता त्यांनी मी आता घरी आलो आहे. आपण उदया भेटु असे सांगितले व फोन ठेवुन दिला. सदरचा काॅल हा व्हाईस रेकाॅर्डर चालु होण्याआधीच करण्यात आलेल्याने सदरचा काॅल व्हाईस रेकाॅर्डर मध्ये रेकाॅर्ड करण्यात आलेला नाही.

त्यांनी मला उदया दिनांक 09/10/2026 रोजी भेट घेण्यासाठी बोलवलेले आहे. त्यामुळे आज रोजीची सापळा कारवाई तात्पुरती स्थिगित करावी. तसेच लोकसेवक वीरकर यांनी माझ्याशी संपर्क केल्यास मी आपणास त्वरीत संपर्क करेल त्यावेळी सापळा कारवाई आयोजित करावी. त्यामुळे सर्वानुमते सदर सापळा कारवाई तात्पुरती स्थगित करण्यात आली. त्यानंतर दि. 12/10/2026 रोजी तक्रारदार श्री. बुधवंत यांच्या सांगणेवरून पुढिल सापळा कारवाई आयोजित करण्यात आली.

त्यावेळी तक्रारदार यांनी सांगितले की, लोकसेवक वीरकर, वायरमन यांना फोन करून कोठे भेटायचे याबाबत विचारणा करावी लागेल. त्यावेळी आमचे सुचनेवरून तक्रारदार बुधवंत यांनी त्यांचा मोबाईल क्र. 9325532289 यावरून लोकसेवक वीरकर, वायरमन यांचा मोबाईल क्र. 9028054946 यावर स्पीकर ऑन करून बोलणे केले त्यावेळी तक्रारदार यांनी लोकसेवक वीरकर, वायरमन यांना भेटण्याबाबत विचारणा केली असता लोकसेवक वीरकर यांनी भेटण्याची गरज नाही, तुमचे पोलचे काम एका ठेकेदारला दिले आहे वर्गणी करण्याची गरज नाही, असे सांगितले. सदचा कॉल व्हाईस रेकॉर्डरमध्ये रेकॉर्ड केला.. त्यावेळी व्हाईस रेकॉर्डरवर 1/1 अषी फाईल तयार झाल्याचे दिसून आले.

त्यावेळी तक्रारदार यांनी सांगितले की, दरम्यानच्या काळात मला असे समजले की, नविन पोल लावण्यासाठी वीरकर वायरमन यांनी ज्या शेतक-यांकडुन पैसे गोळा केले होते ते त्यांनी काही शेतक-यांना ऑनलाईन परत परत दिले आहे. लोकसेवक वीरकर, वायरमन यांना माझा काहितरी संशय आला असवा त्यामुळे त्यांनी मला भेटण्यासाठी नकार दिला आहे. त्यामुळे वीरकर, वायरमन यांनी माझ्याकडे मागितलेली लाचेची रक्कम आता किंवा भविष्यात स्विकारणार नाही. त्यामुळे सदरची सापळा कारवाई पुर्णतः स्थगित करण्यात येवुन झाले कारवाई वरून लोकसेवक वीरकर, वायरमन यांच्यावर योग्य ती कायदेशीर कारवाई असे सांगितले. त्याप्रमाणे तक्रारदार यांचा सविस्त जबाब लिहुन घेण्यात आला. त्यानंतर सर्वानुमते सदरची कारवाई पुर्णतः स्थगीत करण्यात आली. त्यानंतर तक्रारदार श्री. बुधवंत यांना गोपनीयतेच्या सुचना देवुन त्यांना जाण्यास मोकळीक दिली.

तरी यातील तक्रारदार श्री अमोल दगडु बुधवंत, वय-38 वर्शे, धंदा-षिक्षक, रा.मु.पोस्ट. निंबेनांदुर, ता.षेवगांव, जि. अहिल्यानगर यांनी लोकसेवक वीरकर, वायरमन हे नांदुरहिवरे गावच्या परिसरातील लाईटचा पोल पडलेला असुन नविन पोल बसविण्यासाठी लाचेची मागणी करीत असलेबाबत नोंदविलेल्या लाच मागणी तक्रारीचे अनुषंगाने करण्यात आलेल्या लाच मागणी पडताळणी कारवाई वेळी दि.08/10/2026 रोजी 12/26 वा ते 12/47 वा चे दरम्यान नांदुरविहीरे, ता.शेवगाव, जि.अहिल्यानगर येथे लोकसेवक वीरकर वायरमन यांनी तक्रारदार श्री. बुधवंत यांच्याकडे नांदुरविहीरे गावच्या परिसरातील लाईटचा पोल नैसर्गिकरित्या पडलेला असुन त्या ठिकाणी नविन पोल बसविण्यासाठी सहा जणांचे एकुण 6000 रूपये त्यात प्रत्येकी 1,000/- रूपये याप्रमाणे तक्रारदार यांचेकडे 1000 रूपये लाचेची मागणी करुन सदरची लाच रक्कम स्विकारण्याचे मान्य केल्याचे लाच मागणी पडताळणी करावाईमध्ये स्पष्ट झाले आहे, म्हणुन नांदुरविहीरे, ता.शेवगाव, जि.अहिल्यानगर या गावात वायरमन म्हणुन कार्यरत असलेले लोकसेवक बापुसाहेब ठकाजी वीरकर वय 40 वर्ष धंदा (नोकरी - वरिष्ठ तंत्रज्ञ ढोरजळगाव सेक्शन महावितरण)रा. वाघोली ता शेवगाव यांचे विरुध्द भ्रश्टाचार प्रतिबंध अधिनियम सन 1988 चे कलम 7 प्रमाणे कायदेषीर फिर्याद आहे.

हे लिहुन दिले

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.**
(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध दिसून आल्यामुळे):

(1) **Registered the case and took up the investigation (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** Mohan Manikrao Borse (पोलीस निरीक्षक) **or (किंवा):**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव): Rank (हुद्दा):**

No. (क्र.): **to take up the Investigation (तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**
or (किंवा)

(4) **Transferred to P.S. (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

District (जिल्हा): **on point of jurisdiction (अधिकाराच्या दृष्टिकोनातून).**

F.I.R. read over to the complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the complainant /informant, free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली)

R.O.A.C. (आर.ओ.ए.सी.)

Registered by (नोंदणी अधिकारी)

ठाणे अमलदार

Signature of Officer in charge, Police Station (ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

Name (नाव): Mohan Manikrao Borse

Rank (हुद्दा): I (Inspector)

No. (क्र.): API

14. **Signature / Thumb impression of the complainant / informant (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा)**